# १. जय जय हे भारत देशा

**मंगेश पाडगावकर** (१९२९ ते २०१५) :

प्रथितयश कवी. वृत्तबद्ध रचना, शब्दप्रभुत्व, गेयता ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे 'धारानृत्य', 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव', 'विदूषक', 'सलाम', 'गझल', 'भटके पक्षी', 'बोलगाणी' हे कवितासंग्रह; संत मीराबाई, संत कबीर आणि संत तुलसीदास यांच्या काव्याचे भावानुवाद; 'बोरकरांची कविता' व 'संहिता' ही महत्त्वपूर्ण संपादने; 'निंबोणीच्या झाडामागे' हा ललित निबंधसंग्रह; 'भोलानाथ', 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालगीतसंग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. 'वात्रटिका' हा संग्रह त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू दाखवणारा आहे.

प्रस्तुत गीतात देशप्रेम आणि एकात्मता यांचा आविष्कार झालेला दिसतो.

तू नव्या जगाची आशा
जय जय हे भारत देशा

तपोवनातुन तुझ्या उजळली उपनिषदांची वाणी
मातीमधुनी तुझ्या जन्मल्या नररत्नांच्या खाणी
जय युगधैर्याच्या देशा
जय नवसूर्याच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

बळापुढे वा छळापुढे नच इथे वाकल्या माना
अन्यायाला भरे कापरे बघुनि शूर अभिमाना
जय आत्मशक्तिच्या देशा
जय त्यागभक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

श्रमांतुनी पिकलेली शेते पहा डोलती धुंद
घामाच्या थेंबांतुन सांडे हृदयातिल आनंद
जय हरित क्रांतिच्या देशा
जय विश्वशांतिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

पहा झोपड्या कंगालांच्या थरारल्या भवताली
अंधाराला जाळित उठल्या झळकत लाख मशाली
जय लोकशक्तिच्या देशा
जय दलितमुक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा



(गीतपुष्पांचा फुलोरा या संपादित पुस्तकातून)

(प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे.)

CX9NRD